दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २५७ । शनिवार ११ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# मंत्री विखेंच्या पुढाकाराने जिल्ह्यात वारी नियोजनाचा पॅटर्न

## वारकरी व्यक्त करीत आहे समाधान





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी वारीच्या अध्यात्मिक सोहळ्याच्या निमिताने पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासनाने तयार केलेला नियोजनाचा पॅटर्न वारकरी सांप्रदायाला दिलासा देणारा ठरला आहे. अहील्यानगरसह अन्य जिल्ह्यातील पालख्याही रवाना होत असल्याने पालखी मार्ग विठ्ठलमय झाला आहे. अध्यात्माचा वारसा असलेल्या अहील्यानगर जिल्ह्यातून मानाच्या पालख्यांसह असंख्य गावातील वारकरी पंढरपूरला जात असतात.यापुर्वी वारकरी सांप्रदायाचा एवढा गांभीर्यपुर्वक विचार झाला नव्हता. त्यामुळे पालखी मार्गावर वारकार्यांना मोठ्या समस्यांना सामना करावा लागत होता.मंत्री विखे पाटील सोलापूर आणि अहील्यानगरचे पालकमंत्री झाल्यानंतर आषाढी वारी करीता येणार्या वारकर्यांसाठी सुविधा निर्माण करून देण्याच्या हेतूने प्रथमच दोन्ही जिल्ह्यात योग्य तो समन्वय घडवून त्यांनी वारकर्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याची संकल्पना कृतीत उतरवली त्यानूसार सलग तिसर्या वर्षी मंत्री विखे पाटील यांनी जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून दिंडी जात असलेल्या मार्गावर वॉटरफ्रूप मंडप,पिण्याच्या पाण्याची सुविधा स्वच्छता गृह,महीला व पूरुषांसाठी स्वतंत्र आंघोळीची व्यवस्था आणि विशेष म्हणजे आरोग्य आणि सुरक्षा पथक देखील चांगल्या पद्धतीने नियुक्त केले आहेत.विशेष म्हणजे रस्ते दुरूस्त झाल्याचे मोठे समाधान वारकरी व्यक्त करीत आहेत.

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अहील्यानगर प्रशासनाने आषाढी वारीसाठी निर्माणए केलेला पॅटर्न जिल्ह्याच्या अध्यात्मिक क्षेत्राची नवी ओळख ठरली आहे.जिल्ह्यातून चार मानाच्या पालख्यासह नासिक जळगाव धुळे या जिल्ह्यातील अनेक देवस्थांच्या पालख्या मार्गस्थ होत असतात.यंदा ही संख्या तिनशेहून अधिक असल्याचे सांगण्यात येते.

जिल्ह्यातून मोठ्या संख्येने वारकरी पंढरपूरला जात असून विठ्ठल नामाच्या जयघोषाने जिल्हा दुमदुमून गेला आहे.जिल्हा प्रशासन मार्गावर सतर्कतेने वारकर्यांच्या स्वागतासाठी सज्ज असून प्रत्येक तालुक्यात एक समन्वय अधिकारी नेमून देण्यात आल्याने दिंडी प्रमुखांना संपर्क साधण्यात कोणतीही अडचण येत नाही.सध्या पाऊस थांबला असला तरी मुक्कामासाठी भव्य मंडप उभारल्याचा मोठा दिलासा मिळाला आहे.

मागील तीन वर्षापासून सुरू झालेला पॅटर्न जिल्ह्याच्या अध्यात्मिक क्षेत्राची नवी ओळख ठरलाच पण यापेक्षाही महत्वाचे म्हणजे मंत्री विखे पाटील यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या उपक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र

■ पान ४ वर



नगर– दौंड रस्त्यावरील खंडाळाजवळ ट्रक व कंटेनर यांची समोरासमोर धडक होऊन दोन्ही वाहनांनी अचाकन पेट घेतला. या वाहनातील दोन्ही वाहन चालक गंभीर जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखले केले आहे.

# श्रीरामपूर गोळीबार प्रकरणातील फरार आरोपीला पुणे येथून अटक



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रीरामपूर येथील पूर्णवादनगर भागात झालेल्या गोळीबार प्रकरणातील फरार आरोपी ओम राहुल कर्पे (वय १९, रा. श्रीरामपूर) याला स्थानिक गुन्हे शाखेने पुणे येथून शिताफीने ताब्यात घेतले आहे. दिनांक २ जुलै रोजी जुन्या वादातून मुख्य आरोपी अभय सुरेश ससाणे आणि त्याच्या साथीदारांनी शुभम यादव याच्यावर बंदुकीतून गोळी झाडून त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता आणि आर्म ॲक्टन्वये गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यातील मुख्य आरोपी अभय ससाणे आणि अक्षय कपोते यांना यापूर्वीच अटक करण्यात आली आहे. उर्वरित फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक रवाना करण्यात आले होते. तपासादरम्यान, आरोपी ओम कर्पे हा पुण्यात लपल्याची गुप्त माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार पिंपरी-पुणे येथील अण्णासाहेब मगर स्टेडियम परिसरातून संशयितरीत्या फिरत असलेल्या कर्पेला पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून, पुढील तपासासाठी त्याला श्रीरामपुर शहर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

# भारतीय प्रवाशांची बोट उलटून व्हिएतनाममध्ये १५ पर्यटकांचा मृत्यू

नवीदिल्ली । वृत्तसंस्था
परदेशात पर्यटनासाठी गेलेल्या भारतीय नागरिकांबाबत एक अत्यंत दुर्दैवी बातमी समोर आली आहे. व्हिएतनाममधील फु क्वोक द्वीप परिसरात भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी एक स्पीडबोट समुद्रात उलटली. या भीषण अपघातात १५ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाल्याची अधिकृत माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ओशन पियर आइलैंड कंपनीची एक स्पीडबोट पर्यटकांना घेऊन होन में रुटवरून एन थोई पोर्टकडे जात होती. फु क्वोक विमानतळापासून अवघ्या २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या होन में रूट न्गोईजवळ अचानक ही बोट उलटली आणि सर्व प्रवासी समुद्रात फेकले गेले. या बोटीमध्ये एकूण ३६ प्रवासी प्रवास करत होते.


स्थानिक प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, ज्यावेळी हा अपघात झाला, त्यावेळी परिसरात पाऊस पडत नव्हता. मात्र, समुद्रातील लाटा अत्यंत वेगवान आणि तीव्र होत्या.

■ पान ४ वर

# राज्यासह देशावर अल निनोच्या संकटाचे ढग

**मुंबई । वृत्तसंस्था** – जूनमध्ये रुसून बसलेल्या पावसाने जुलैच्या पहिल्या आठवड्यात दमदार हजेरी लावत बहुतांश जिल्ह्यांना अक्षरशः झोडपून काढलं. मात्र जुलै महिन्याच्या सुरुवातीला बरसणाऱ्या पावसाने पुन्हा एकदा विश्रांती घेतली आहे. राज्यात मान्सूनने दमदार बॅटिंग करत जून महिन्यातील पावसाची तूट भरून काढली. तर कुठे जलसंकाटाचे ढग काहीसे निवळले होते. असे असताना प्रशांत महासागरात सक्रिय होत असलेल्या अल निनोमुळे मान्सूनचा वेग अचानक मंदावला आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार १० जुलै ते १५ जुलै दरम्यान उत्तर, पश्चिम आणि मध्य भारतासह महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर पावसाचे प्रमाण कमालीचे घटणार आहे. सध्या अरबी समुद्रात आणि उत्तर भारतात निर्माण झालेला कमी दाबाचा पट्टा कमकुवत होऊन पुढे निघून गेल्यामुळे ढगांची दाटी विरळ झाली



आहे. १९ जुलैपर्यंतही हीच स्थिती कायम राहू शकते. दरम्यान, मुंबई-कोकणात मध्यम स्वरूपाचा पाऊस तर उर्वरित महाराष्ट्रात उन्हाचा चटका वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मुंबईत जूनमध्ये पावसाने ओढ दिल्यानंतर जुलै महिन्याच्या पहिल्या पाच दिवसातच

■ पान ४ वर

# सकाळी मंगळसूत्र चोरी, दुपारी घरफोडी; नवीन पीआयना गुन्हेगारांची कडक सलामी!



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**कोपरगाव–** कोपरगाव शहरात गुरुवारी ९ जुलै रोजी चोरट्यांनी भरदिवसा चोरी करत अक्षरशः धुमाकूळ घातला. सकाळी एमएसइबी कार्यालयाजवळ महिलेचे मंगळसूत्र ओरबाडल्याची घटना घडली तर दुपारी भरदिवसा एकाच इमारतीमधील चार फ्लॅट्स लक्ष्य करत घरफोडीचा धाडसी प्रयत्न केला. कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात काही दिवसांपूर्वीच रुजू झालेल्या नवीन पोलीस निरीक्षकांना चोरट्यांनी ही एकप्रकारे कडक सलामीच दिल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. घडलेल्या घटनांमुळे शहरात प्रचंड भीतीचे व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

कोपरगाव शहरातील पॉवर हाऊस जवळील भागात गुरुवारी सकाळी ६ वाजेच्या सुमारास साधना प्रवीण पापडीवाल (वय ६०) या नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकसाठी जात होत्या. दरम्यान, पल्सर दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील ३० हजार रुपये किमतीची सोन्याची चैन जबरदस्तीने ओरबाडली आणि क्षणात पोबारा केला. याप्रकरणी साधना पापडीवाल यांच्या फिर्यादीवरून कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सकाळच्या चोरीचा तपास सुरू असतानाच, दुपारी ४ वाजेच्या सुमारास साईसिटी परिसरातील साई रेसिडेन्सी येथे दिवसाढवळ्या धाडसी घरफोडीची घटना समोर आली. चोरट्यांनी इमारतीमधील तीन फ्लॅटच्या दरवाजांचे कुलूप तोडून घरातील सामानाची उचकापाचक केली, तर चौथा फ्लॅटही फोडण्याचा प्रयत्न केला.इमारतीमधील सफाई कर्मचाऱ्याला दोन अनोळखी व्यक्ती संशयास्पदरीत्या बाहेर जाताना दिसल्या. त्याने तातडीने येथील रहिवासी तथा माजी सैनिक जगझाप आणि विकास आघाव यांना याची कल्पना दिली. दोघांनीही तत्परता दाखवत तात्काळ दुचाकीवरून चोरट्यांचा पाठलाग केला. मात्र, संशयित आरोपी एका कारमध्ये बसून सुसाट वेगाने पसार झाले. सुदैवाने, घरातील मोठा ऐवज चोरीला जाण्यापासून वाचला असला, तरी या घटनेने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे. याप्रकरणी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली नाही.

कोपरगाव शहर आणि तालुका पोलीस ठाण्यात काही दिवसांपूर्वी दोन्ही पोलीस निरीक्षक नव्याने हजर झाले आहे. तालुका पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी पदभार स्वीकारताच धडाकेबाज कारवाया सुरू करत गुन्हेगारांमध्ये खाकीची दहशत निर्माण करून सर्वसामान्य नागरिकांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यास सुरुवात केली आहे मात्र शहर पोलीस निरीक्षक उद्धव डमाळे अजूनही सायलेंट मोडवर असल्याचे दिसत आहे त्यामुळे भर दिवसा घरफोडी पर्यंत चोरट्यांची मजल वाढली आहे. एकाच

■ पान ४ वर

# ‘वारकरी माझ्या दारात येतात, मी नशीबवान’ – करीमशेठ हुंडेकरी

## सलग १४ वर्षे मुस्लिम समाजातील करीमशेठ हुंडेकरींकडून सायकल वारकऱ्यांचे भक्तिभावाने स्वागत । हुंडेकरी यांच्या सेवेला माजी पोलीस आयुक्त हरीश बैजल यांचा सलाम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर नाशिक ते पंढरपूर अशी सायकल वारी करणाऱ्या वारकरी सायकलपटूंचे अहिल्यानगर शहरात मुस्लिम समाजातील ज्येष्ठ उद्योजक व समाजसेवक हाजी करीमशेठ हुंडेकरी यांच्या वतीने भक्तिभावाने व उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. गेल्या सलग १४ वर्षांपासून सुरू असलेली ही सेवाभावी परंपरा यंदाही कायम राखत हुंडेकरी परिवाराने वारकऱ्यांच्या निवास, भोजन, अल्पोपहार आणि इतर सर्व सोयींची उत्कृष्ट व्यवस्था केली. धर्म, जात आणि पंथाच्या पलीकडे जाऊन माणुसकीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

नाशिक सायकलिस्ट फाऊंडेशनच्या वतीने गेल्या चौदा वर्षांपासून नाशिक ते पंढरपूर सायकल वारीचे आयोजन करण्यात येते. सुरुवातीला अवघ्या ७५ सायकलपटूंनी सुरू झालेल्या या वारीत आज तब्बल ३५० सायकलपटू सहभागी होत आहेत. यामध्ये ५५ महिला सायकलपटूंचा समावेश असून, आठ दृष्टीहीन आणि एक पाय नसलेले तीन दिव्यांग टँडेम (डबल सीट) सायकलच्या माध्यमातून ही वारी पूर्ण करत आहेत. यंदाच्या वारीत तब्बल २०० नवीन



सायकलपटूंनी सहभाग नोंदविला आहे.

या स्वागत सोहळ्यात नाशिक सायकलिस्ट फाऊंडेशनचे अध्यक्ष अमित घुगे, वारी प्रमुख दविंदरसिंग भेला, सचिव नितीन कोटकर, सायकल दिंडीचे संस्थापक तथा माजी पोलीस आयुक्त हरीश बैजल, वारी प्रमुख अश्विनी कोंडेकर यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी पोलीस आयुक्त हरीश बैजल यांनी हुंडेकरी परिवाराच्या सेवाभावाचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, ‘‘२०१४ मध्ये ७५ सायकलपटूंनी सुरू झालेल्या या वारीसोबत हुंडेकरी परिवार सुरुवातीपासून उभा आहे. वारीतील सहभागींची संख्या सातत्याने वाढत असताना ‘तीनशे काय, तीन हजार वारकरी आले तरी त्यांची सेवा करू’ ही त्यांची उदात्त भावना मनाला स्पर्श करणारी आहे.

■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### केडगाव येथील पुणे हायवे ते स्नेहांकुर संस्थेपर्यंतच्या रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ

अहिल्यानगर- केडगाव प्रभाग क्रमांक १७ मधील पुणे हायवे ते स्नेहांकुर संस्थेपर्यंतच्या बहुप्रतीक्षित रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ करण्यात आला. नगरसेवक जालिंदर कोतकर यांनी केडगावच्या सर्वांगीन विकासासाठी सर्व नगरसेवक एकदिलाने कार्यरत असून, प्रभागातील प्रत्येक प्रलंबित प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावणार असल्याचा निर्धार व्यक्त केला. नगरसेवक मनोज कोतकर म्हणाले की, पुणे रोड ते स्नेहांकुर संस्थेपर्यंतच्या रस्त्याच्या कॉँक्रीटीकरण व डांबरीकरणाची मागणी स्नेहांकुर संस्थेकडून गेल्या चार ते पाच वर्षांपासून सातत्याने करण्यात येत होती. आमदार संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्यामुळे या रस्त्यासाठी भरीव निधी मंजूर झाला असून, आज या महत्त्वपूर्ण विकासकामाचा शुभारंभ होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.स्नेहांकुर संस्थेत जिल्ह्यासह राज्याच्या विविध भागांतून नागरिक येत असल्याने या परिसरातील रस्त्याची दुरवस्था शहराच्या प्रतिमेला बाधा ठरत होती. ही बाब आमदार संग्राम जगताप यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तातडीने निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे आता हा रस्ता दर्जेदार स्वरूपात विकसित होणार असून, नागरिकांची गैरसोय दूर होणार आहे. स्नेहांकुर संस्थेच्या माध्यमातून रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात येणार आहे. त्यामुळे परिसर अधिक हिरवागार, स्वच्छ आणि आकर्षक होईल. बाहेरून येणाऱ्या नागरिकांना अहिल्यानगर शहराची सकारात्मक आणि सुशोभित प्रतिमा पाहायला मिळेल, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.जालिंदर कोतकर म्हणाले की, या कामाचा शुभारंभ सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत होत असल्याचा आनंद आहे. केडगाव विकासाच्या दिशेने सातत्याने वाटचाल करत असून, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न नियोजनबद्ध पद्धतीने सोडविले जात आहेत. नगर शहराचे आमदार संग्राम जगताप आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागातील चारही नगरसेवक नागरिकांच्या मूलभूत सुविधांना प्राधान्य देत आहेत. केडगावचा सर्वांगीन विकास करून हा परिसर आदर्श आणि विकसित करण्याचा आमचा संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले.प्रभागासह संपूर्ण केडगावमधील अनेक समस्या सोडविण्यासाठी सर्व नगरसेवक समन्वयाने काम करत आहेत. निवडणुकीनंतर गेल्या सहा महिन्यांपासून नवीन निधी उपलब्ध झाला नसला, तरी पूर्वी मंजूर झालेल्या विकासकामांची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. आगामी काळात जसा-जसा निधी उपलब्ध होईल, तसा-तसा प्रत्येक भागातील प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडविले जातील.

### उषा साळवे यांचे अल्पशा आजाराने निधन



अहिल्यानगर- सावेडी उपनगरातील निर्मलनगर येथील रहिवाशी व अहिल्यानगर बौद्ध संस्कार संघाच्या महाउपासिका सौ. उषा मिराजी साळवे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ६६ वर्षांच्या होत्या. अहिल्यानगर येथील अमरधाम मध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या मागे पती, २ मुले, सुना, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. सेवानिवृत्त विक्रीकर अधिकारी एम.बी.साळवे यांच्या त्या पत्नी होत.

### नेमीचंद चुनीलाल चुडीवाल यांचे निधन



अहिल्यानगर - येथील दिगंबर जैन समाजातील ज्येष्ठ सदस्य नेमीचंद चुनीलाल चुडीवाल (वय ८९) यांचे शुक्रवार १० जुलै रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. दिगंबर जैन समाजातील धार्मिक कार्यक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असे. त्यांचे पश्चात पत्नी, तीन भाऊ - भागचंद, सुभाष, अशोक चुडीवाल तसेच त्यांची मुलगी सूरज व जावई महावीर थोलिया ( वैजापूर ) व नातवंडे असा परिवार आहे. आज शनिवार दि. ११ जुलै रोजी जैन धर्मातील विधीनुसार नालेगाव अमरधाम येथे त्यांचे पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### सारडा महाविद्यालयात पिलईइस्त्रो आऊटरीच प्रोग्राम अंतर्गत सॅटेलाईट बनवा कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

# विज्ञान आणि तंत्रज्ञान हे देशाच्या प्रगतीचे आधारस्तंभ -मधुसूदन सारडा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** हिंद सेवा मंडळाचे पेमराज सारडा महाविद्यालय आणि मुंबई येथील पिलई एच.ओ.सी. महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पिलईइस्त्रो आऊटरीच प्रोग्राम अंतर्गत ''सॅटेलाईट बनवा'' या अभिनव व विज्ञाननिष्ठ कार्यशाळेचे आयोजन सारडा महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात नुकतेच संपन्न झाले.विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान आणि अंतराळ संशोधनाविषयी आवड निर्माण करून त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेज कमिटीचे चेअरमन मधुसूदन सारडा हे होते.प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित,उपप्राचार्य प्रा.गिरीश पाखरे तसेच पर्यवेक्षक डॉ.सुजित कुमावत आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी समन्वयक प्रा.अविनाश झरेकर यांनी प्रास्ताविकातून ''पिलईइस्त्रो आऊटरीच प्रोग्राम'' ची उद्दिष्टे,विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान-तंत्रज्ञानाची गोडी निर्माण करण्याची आवश्यकता तसेच ''सॅटेलाईट बनवा'' या कार्यशाळेचे महत्त्व विशद केले. त्यांनी विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांमधून संशोधनाची वृत्ती, नवोपक्रमशील विचार आणि वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करण्याचे आवाहन केले.अशा प्रकारे कार्यशाळेच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानविषयक स्वप्ने प्रज्वलित होण्यास मदत होते. तसेच हीच स्वप्ने त्यांना भविष्यात नवनिर्मिती आणि उत्कृष्टतेकडे घेऊन जातील.

याप्रसंगी मुंबई येथून खास आलेले पिलईइस्त्रो आऊटरीच प्रोग्रामचे प्रतिनिधी आफशान खान, प्रियंका साह,नवल महाडिक,आयुष बाबरे,शादाब सय्यद यांनी विद्यार्थ्यांना उपग्रहाची संकल्पना, त्याची रचना, विविध प्रणाली, कार्यपद्धती तसेच अंतराळ संशोधनातील उपग्रहांचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

प्रत्यक्ष कृतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी लघु उपग्रहाचे मॉडेल तयार करत विज्ञानातील विविध संकल्पना अनुभवातून आत्मसात केल्या.कार्यशाळेतील कृतीप्रधान शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, सर्जनशीलता,तांत्रिक कौशल्य आणि संघभावना विकसित होण्यास मोठी मदत झाली.

अध्यक्षीय मनोगतात मधुसूदन सारडा यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञान हे देशाच्या प्रगतीचे आधारस्तंभ असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी नवसंशोधनाची कास धरून भविष्यात देशाच्या वैज्ञानिक प्रगतीत योगदान द्यावे.असे आवाहन केले तसेच सारडा महाविद्यालयाच्या अकरावी शास्त्र शाखेतील विद्यार्थ्यांसाठी ऑगस्ट महिन्यात इस्त्रो या संस्थेमध्ये सहल आयोजित करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला.

ब्रिजलाल सारडा यांनी विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा सकारात्मक उपयोग करून संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करावे,अशी अपेक्षा व्यक्त केली.हिंद सेवा मंडळाला गौरवशाली परंपरा असून येथील दादा चौधरी विद्यालयातील विद्यार्थी सामान्य परिस्थितीत शिक्षण घेऊन त्याची इस्त्रो या संस्थेमध्ये निवड झाली आहे.विद्यार्थ्यांनी अध्यात्म आणि विज्ञान यांची योग्य सांगड घालून वाटचाल करावी.असे गौरवोद्गार काढले.

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी विज्ञान विभागाने आयोजित केलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून विद्यार्थ्यांनी त्याचा पुरेपूर फायदा घेण्याचे आवाहन केले.त्याचबरोबर वर्षभर विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्याचा महाविद्यालयाचा मानस त्यांनी बोलून दाखवला.याप्रसंगी त्यांनी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.जयंत नारळीकरांचा उल्लेख करून मनोरंजनातून विज्ञान प्रसार साधण्याचा उपक्रम महाविद्यालयातील विज्ञान विषयाच्या प्राध्यापकांनी राबवावा.असे आवाहन केले.

सध्या युद्धाच्या काळामध्ये युक्रेन आणि रशिया या देशांनी सगळ्यात जास्त प्रमाणात ड्रोन आणि सॅटॅलाइट प्रणालीचा वापर केला असल्याचे असे प्रतिपादन महाविद्यालयाचे उप प्राचार्य प्रा.गिरीश पाखरे यांनी केले.कोणत्याही राष्ट्राच्या संरक्षण सुसज्यतेच्या अनुषंगाने तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे व त्याच्या अंमलबजावणीसाठी विद्यार्थ्यांनी या क्षेत्रातील विविध संधी तसेच उपयुक्तता याचा विचार करून त्याप्रमाणे वाटचाल करावी.असे आवाहन त्यांनी केले.विद्यार्थ्यांमध्ये अंतराळ विज्ञानाची आवड निर्माण करून त्यांना संशोधनाच्या दिशेने प्रेरित करणारा हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला असून, भविष्यात अशा उपक्रमांमधून अनेक युवा वैज्ञानिक घडतील, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. याप्रसंगी प्रा.जयश्री पवार, प्रा.अपर्णा शेपाळ,प्रा.राहुल गागरे, प्रा.अश्विनीकुमार बिडकर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक,कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.मंदार वैद्य यांनी केले.

# बुरुडगाव कचरा डेपो आग प्रकरणी महापालिका प्रशासनाने आत्मपरीक्षण करावे

### भावी पिढीला नरकात लोटण्याचे पाप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महानगरपालिकेच्या बुरुडगाव येथील कचरा डेपोला नेहमीच आग लागते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण तर होतेच परंतु आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांचे आरोग्य देखील धोक्यात येत आहे. काही वर्षांपूर्वी बुरुडगाव येथील स्थानिक गावकरी कचरा डेपोमुळे होणाऱ्या त्रासाविरोधात आंदोलन करायचे. मात्र आता कचरा डेपो मधून महिनाभरापासून धुराचे लोट निघत आहेत. तरी देखील स्थानिक नागरिक गप्प आहेत.
गावाबाहेरील पर्यावरण प्रेमी कचरा डेपोच्या आगीची व धुराची दखल घेऊन जिल्हा प्रशासन व महापालिका प्रशासनाकडे तक्रार करत आहेत. मात्र स्थानिक नागरिकांचे मौन मात्र आश्चर्यजनक आहे.

कचरा डेपोमध्ये जमा होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च केला जातो. तरीदेखील तेथे कचऱ्याला आग लागून मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होते. ही बाब महापालिका प्रशासनाला माहित नाही असे काहीही नाही.

कचरा डेपोतील सर्व घडामोडी महापालिका प्रशासनातील सर्व वरिष्ठ अधिकारी, विभाग प्रमुख याचबरोबर पदाधिकारी यांना सर्वांना माहीत आहे. अनेक सामाजिक कार्यकर्ते याबाबत वर्षानुवर्षे तक्रारी करून थकले. परंतु या प्रदूषणात व परिस्थितीत काहीच बदल होत नाही. कचरा प्रक्रियेसाठी येणारा पैसा कागदोपत्री खर्च करून कोट्यावधीचा निधी अक्षरशः गिळला जातो.

भ्रष्टाचार ही न थांबणारी बाब आहे. परंतु कोणत्या बाबतीत आणि किती प्रमाणात भ्रष्टाचार करावा याबाबत महापालिका प्रशासनाने आत्मपरीक्षण करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. शासनाने घनकचरा हाताळणीसाठी कठोर नियम केलेले आहेत. मात्र ते फक्त नागरिकांसाठीच आहेत का ? असा प्रश्न या कचरा डेपोतील धुरामधून निर्माण झाला आहे. सर्वसामान्य नागरिकांनी कचऱ्याच्या बाबतीतील नियम मोडले तर त्यांना तात्काळ दंड होतो. इथे मात्र महिनाभरापासून कचऱ्याचे ढीग पेटून वायू प्रदूषण होत आहे. मात्र संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीच कारवाई होत नाही. कारण हे सर्व संगनमताने सुरू असून सगळे एकमेकांचा बचाव करतात. प्रदूषणासंदर्भातील पर्यावरणप्रेमींच्या तक्रार अर्जांना थेट कचरा डेपो दाखवला जातो.

# गरोदरपणात नियमित आरोग्य तपासणी आवश्यक - डॉ. अमोल जाधव

### प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व योजनेअंतर्गत बुऱ्हाणनगर येथे गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व योजनेअंतर्गत प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेला गर्भवती महिलांची विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येते. या उपक्रमाअंतर्गत सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल तर्फे स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. अमोल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांची आरोग्य तपासणी करण्यात येत आहे. नगर तालुक्यातील बुर्हाणनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात ही तपासणी झाली. सुमारे ९० गरोदर मातांची तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. हरिभाऊ गाढे, डॉ. सुमय्या पठाण, डॉ. वैष्णवी गोपाळघरे, पल्लवी सुरांडकर, आर.आर.गायकवाड, एंन.एस. पतंगे आदी उपस्थित होते. या तपासणीमध्ये डॉ. जाधव यांनी गर्भवती महिलांमधील हाय रिस्क प्रेग्नन्सी ओळखणे, रक्तदाब कमी किंवा जास्त असणे, रक्तातील हिमोग्लोबिन कमी असणे, शुगर, सूज, तसेच आईच्या पोटातील बाळाची वाढ कमी असणे किंवा पाणी कमी असणे अशा विविध समस्यांचे निदान करून योग्य उपचार मार्गदर्शन केले. तसेच सुरक्षित व नॉर्मल डिलिव्हरीसाठी आवश्यक असणारे आहार, व्यायाम, जीवनशैली आणि काळजी याबाबत महिलांचे समुपदेशन केले. महिलांनी नियमित तपासणी करून आई व बाळाच्या आरोग्याची योग्य काळजी घ्यावी.सध्या सोशल मीडियावर विविध प्रकारचे रिल्स आणि माहिती मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळते. मात्र प्रत्येक माहिती सर्वांसाठी योग्य असेलच असे नाही. अनावश्यक किंवा चुकीच्या माहितीकडे पाहून मनात भीती निर्माण करून घेऊ नये तसेच प्रत्येक गोष्ट स्वतःशी जोडून कॉम्प्लिकेशनची चिंता करू नये. कोणतीही शंका असल्यास तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा ९ वर्षांच्या वाटचालीत डॉ. अमोल जाधव यांनी सामाजिक बांधिलकी जपत शासनाच्या विविध आरोग्य योजनांतर्गत महिला आरोग्याचा जागर केला आहे. शहरी तसेच ग्रामीण भागात शिबिरे घेऊन महिलांना आरोग्य विषयक बहुमूल्य मार्गदर्शन केले आहे.
गर्भधारणेपासून प्रसूतीपर्यंतचा नऊ महिन्यांचा प्रवास सुरक्षित, निरोगी आणि आनंददायी व्हावा यासाठी सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सातत्याने कार्यरत आहे.

# श्रीकांत दोंदे हत्या प्रकरण तापले; न्यायाच्या मागणीसाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठासमोर रास्ता रोको आंदोलन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत असलेल्या मागासवर्गीय दलित कुटुंबातील श्रीकांत पोपट दोंदे यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई, उच्चस्तरीय चौकशी, पीडित कुटुंबाला आर्थिक मदत आणि पुनर्वसनाच्या मागण्यांसाठी गुरुवारी (दि. ९ जुलै) महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर शिवसेना सामाजिक न्याय विभागाच्या वतीने ग्रामस्थांसह रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. सुमारे एक तासाहून अधिक काळ चाललेल्या आंदोलनामुळे नगर-मनमाड महामार्गावरील वाहतूक दोन्ही बाजूंनी ठप्प झाली होती. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.
आंदोलनकर्त्यांनी आरोप केला की, श्रीकांत दोंदे यांच्या हत्येनंतर वारंवार निवेदने, आंदोलने आणि पाठपुरावा करूनही प्रशासनाने ठोस कारवाई केलेली नाही. त्यामुळे न्यायासाठी रस्त्यावर उतरावे लागल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.
यापूर्वी १२ जून रोजी महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावर गेट बंद आंदोलन आणि ठिय्या आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी विद्यापीठाच्या सुरक्षा कार्यालयाकडून लेखी आश्वासन देण्यात आले होते. त्यामध्ये कै. श्रीकांत दोंदे यांच्या कुटुंबाला मिळणाऱ्या विमा रकमेबाबत आवश्यक कागदपत्रे, म्हणजे मृत्यूचा दाखला, शवविच्छेदन अहवाल आणि वारस दाखला प्राप्त होताच मजूर पुरवठा करणाऱ्या ठेकेदारामार्फत पुढील कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले होते. मात्र, आजपर्यंत त्याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी करत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.
शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे पाटील, महिला जिल्हाप्रमुख उज्वला गवळी, मालन जाधव, पोपटराव दोंदे, रमाकांत दोंदे, सिंधुताई साळवे, ज्योती पाटोळे, सिद्धांत पाटोळे, प्रियांका कदम, भाऊसाहेब कदम, प्रमोद जौजाळ, भाऊसाहेब पंडित, कृष्णा कांबळे, कल्याण गायकवाड, इंदुबाई पंडित यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ आणि दोंदे कुटुंबीय सहभागी झाले होते.
श्रीकांत दोंदे हे महात्मा फुले कृषी विद्यापीठात सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत होते. २ जून २०२६ रोजी कर्तव्य बजावत असताना त्यांची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली होती.

### शब्दकोडे क्रमांक : ३



**आडवे शब्द :** १.वसा ३.मृदा ४.शेती करणारा ७.द्वेष ८.शोभा ९.निसर्गाचे रौद्ररूप १०.सामानांची लिस्ट ११.एक पवित्र मुस्लिम महिना १२.फोडणीसाठी वापरतात ते १३.जानकी १५.जिन्नस १७ रात्री चमकणारी चांदणी १९.घुसळून केलेली डाळ २१.प्रयत्न २३.एक पेय २५.मोराच्या डोक्यावर तेवतो २५अ.बुद्धिबळातील एक डाव २६.एक नक्षत्र २८.तळव्याचा उंचवट्याचा भाग ३०.फळांची केलेली शेतीची जागा ३१.शिरगाव ३२.उद्याच्या नंतर येणारा दिवस ३३.दक्ष ३४ अभिनेता ३५.भूप ३८.चिंतन ३९.उदयाच्या आधी येणारा दिवस ४०.हिंदीत-मन ४१.मुसलमान ४३.नूतन ४५.दंगा ४६.सहली निमित्त केलेला प्रवास ४७.अनेक खोल्याचा महाल ४८.संगीतातील एक ताण दरोडेखोरांसाठी प्रसिद्ध असलेले उत्तर भारतातील एक खोरे ५०.हिंदीत- शंभर **उभे शब्द :** १.उत्तर भारतातील एक पवित्र शहर २.माज ३.काळ्या जादूचा एक प्रकार ४.थंडी पळवण्यासाठी केलेला विस्तव ५.बारा वर्षांचा काळ ६.एक अरब चलन १२.बारा आणि एक मिळून तयार होणारी संख्या १४.जेवणावर मारलेला मनमुराद आस्वाद १६.लहर १७.थाली १८.गोमाता २०.शिरा करण्यासाठी वापरतात तो मुख्य पदार्थ २१.एक झाडूचा प्रकार २२.पाय २३.श्रीदेवी ची दुहेरी भूमिका असलेला एक हिंदी सिनेमा २४.भारताचे राष्ट्रीय फूल २५ अ.पायात बांधवयाचे घुंगरू २७.चेव २९.पातळ,बारीक,एका सरळ रेषेतला ३०.पाण्याचे कारंजे ३१.जन्म देण्याची क्रिया ३३.साल ३४.उपहार ३६.मसाल्यातील एक पदार्थ ३७.सुंदर ३८.एक मराठी हिंदी अभिनेत्री *** नाईक ४२.खाली-विरुद्ध ४४.वायु ४६.एक हिंदी चॅनल

**शब्दकोडे क्रमांक : २ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग | ण | प | ती | | स | | रा | ज | ग | ड | |
| ज | | गा | न | स | म्रा | ज्ञी | | रा | | र | स |
| ब | हा | र | | पा | ट | | प | सं | द | | व |
| ज | रा | | था | ट | | सा | व | ध | | ता | ल |
| | कि | या | रा | | ब | | न | | प | र | त |
| मा | री | च | | सा | ग | र | | शे | र | पा | |
| मा | | क | डा | | ळा | | बी | | ता | | मा |
| | मा | | व | ड | | ग | | ह | वा | मा | न |
| ना | य | ग | रा | | प | ड | सा | द | | न | व |
| रा | | ट | | नि | | द | व | | म | हा | |
| ज | ल | | प | रा | त | | ज | म | | नी | ट |
| | ढा | का | | शा | स | क | | ग | वा | | क |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### शाश्वत मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये दुर्बिणीद्वारे मूत्रपिंड काढण्याची यशस्वी शस्त्रक्रिया

**अहिल्यानगर - शाश्वत मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये २३ वर्षीय युवकावर दुर्बिणीद्वारे (लॅप्रोस्कोपिक) मूत्रपिंड काढण्याची (लॅप्रोस्कोपिक नेफ्रेक्टॉमी) यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. या रुग्णाचे डावे मूत्रपिंड पूर्णपणे निकामी (नॉन-फंक्शनिंग) झाले होते. त्यामुळे त्याला वारंवार तीव्र वेदना होत होत्या व त्याच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत होता. आवश्यक तपासणीनंतर निकामी झालेल्या मूत्रपिंडामुळेच ही समस्या असल्याचे निदान करण्यात आले. रुग्णावर अत्याधुनिक दुर्बिणीद्वारे (मिनिमली इन्वेसिव्ह) शस्त्रक्रिया करून निकामी झालेले मूत्रपिंड यशस्वीरित्या काढण्यात आले. या पद्धतीमुळे मोठा चिरा न देता शस्त्रक्रिया करता येते. त्यामुळे शस्त्रक्रियेनंतर वेदना कमी होतात, रक्तस्राव कमी होतो, संसर्गाचा धोका कमी राहतो आणि रुग्ण लवकर बरा होऊन दैनंदिन जीवनात परतू शकतो. ही शस्त्रक्रिया युरोलॉजिस्ट डॉ. दीपक बी. गाडेकर यांनी भूलतज्ज्ञ डॉ. तेजल कंठाळी यांच्या सहकार्याने यशस्वीरित्या पार पाडली. यामध्ये शाश्वत मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलच्या ऑपरेशन थिएटर, नर्सिंग व इतर सर्व वैद्यकीय कर्मचाऱ्यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. रुग्णाची प्रकृती सध्या उत्तम असून, त्याला यशस्वी उपचारानंतर रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे. शाश्वत मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मूत्ररोगांवरील आधुनिक व सुरक्षित शस्त्रक्रिया नियमितपणे केल्या जात असून, रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली जात आहे.**

अभ्यासक्रमाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड

## सेंट विवेकानंद प्रायमरी स्कूलमध्ये उत्साहात झाला पॉटरी शो

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या प्राथमिक विभागात रोजी इयत्ता तिसरी, चौथी व पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी पॉटरी शो या आगळ्यावेगळ्या शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ( २०२०) तसेच सुधारित अभ्यासक्रमातील मातीकाम या घटकाशी सुसंगत असलेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना अनुभवाधारित शिक्षणाची संधी मिळाली.

यावेळी प्रसिद्ध कुंभार कलाकार श्री. नाथा देवतरसे यांनी चाकावर मातीपासून विविध आकर्षक कलाकृती साकारत त्याचे थेट प्रात्यक्षिक सादर केले. विद्यार्थ्यांनी मातीच्या विविध वस्तू तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया जवळून अनुभवली. यामुळे मातीकामातील कौशल्य, संयम, सर्जनशीलता तसेच भारतीय पारंपरिक कलेचे महत्त्व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष समजले.

यावेळी मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ‘‘राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना अनुभवाधारित शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. मातीकामासारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, कल्पनाशक्ती, निरीक्षणशक्ती आणि हस्तकौशल्य विकसित होते. अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना आपल्या पारंपरिक कलांची ओळख होऊन त्यांच्याबद्दल आदर आणि जतनाची भावना निर्माण होते.‘‘

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री राम मेंघानी, उपाध्यक्ष श्री. रूपचंद मोटवानी, सचिव श्री. गोपाल भागवानी, खजिनदार श्री. दामोधर माखिजा, विश्वस्त श्री. सुरेश हिरानंदानी, श्री महेश मध्यान, श्री हरेष मध्यान व श्री. राजकुमार गुरुनानी, तसेच प्राचार्या सौ. गीता तांबे आणि मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांनी या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना अनुभवाधारित शिक्षण मिळावे आणि पारंपरिक कलांविषयी जाणीव व आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले तसेच विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# व्यापारी मंडळाकडून १९ हजार वारकऱ्यांना महाप्रसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** नगरमध्ये आलेल्या त्र्यंबकेश्वर येथील निवृत्ती महाराज आषाडी वारीला पंढरपूरला जाणाऱ्या पायी दिंडीला मार्केटयार्ड व्यापारी मित्र मंडळच्या वतीने पूर्ण फराळ देण्यात आला गेली १४ वर्षे हा उपक्रम चालू आहे अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष अमोल पोखरणा यांनी दिली

मार्केटयार्ड मधील सर्व व्यापारी एकत्र येऊन वारकर्यांना आज एकादशी असल्याने फराळ देण्यात आला,यामध्ये उपवासाचे पाच पदार्थ होते. हा पूर्ण फराळ चा लाभ सुमारे १९ हजार च्या वर वारकर्यांनी घेतला. दुपारी १ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यत फराळ वाटप चालू होते, यावर्षी प्रशासनाने उत्तम सहकार्य केले व खुप चांगली व्यवस्था ठेवली त्यामुळे सर्व व्यपाऱ्यानी मनपाचे कौतुक केले.

कार्यक्रम यशश्वी करण्यासाठीसर्व मार्केट परिसरातील सर्व व्यापाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# जन आधार सामाजिक संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन

### संत भगवानबाबा मल्टिस्टेट प्रकरण कथित सहा कोटींचा व्यवहार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री संत भगवानबाबा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी प्रकरणात कथित ६ कोटींच्या व्याज व्यवहारासह दोन मालमत्ता व्यवहारांची एमपीआयडीकायद्यांतर्गत स्वतंत्र व वरिष्ठस्तरीय चौकशी करण्याच्या मागणीसाठी जन आधार सामाजिक संघटनेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष प्रकाश मोहन पोटे यांच्यासह ठेवीदार यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.
निवेदनात म्हटले आहे की, श्री संत भगवानबाबा मल्टिस्टेटमध्ये हजारो ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये अडकले असून गोरगरीब नागरिक, शेतकरी, कष्टकरी, महिला आणि ज्येष्ठ नागरिक गंभीर आर्थिक अडचणीत सापडले आहेत. उपलब्ध कागदपत्रे आणि मूळ व्हिडिओंच्या आधारे श्री. संतोष प्रकाश लुनिया यांच्या आर्थिक तसेच मालमत्ता व्यवहारांची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असल्याचा दावा करण्यात आला आहे.

पोटे यांनी नमूद केले की, उपलब्ध व्हिडिओ क्रमांक ०३, ०४ आणि ०६ मध्ये संतोष लुनिया यांनी श्री संत भगवानबाबा मल्टिस्टेटच्या संचालकांना ६ कोटी व्याजाने दिल्याचा उल्लेख केल्याचा दावा आहे. ही रक्कम कोणाला, केव्हा आणि कोणत्या माध्यमातून देण्यात आली, तिचा आर्थिक स्रोत काय होता, व्यवहाराची बँक व आयकर नोंदींमध्ये नोंद आहे का तसेच संबंधित काळात वैध सावकारी परवाना होता का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनानुसार, मौजे बालमटाकळी (ता. शेवगाव) येथील एक मालमत्ता संतोष प्रकाश लुनिया यांच्या नावावर, तर मौजे कासार पिंपळगाव (ता. पाथर्डी) येथील दुसरी मालमत्ता चैतन्या संतोष लुनिया यांच्या नावावर खरेदी झाल्याचे उपलब्ध खरेदीखतांमधून दिसून येत असल्याचा दावा करण्यात आला आहे. या दोन्ही मालमत्ता बाजारभावाने खरेदी करण्यात आल्या की कथित ६ कोटींच्या व्यवहाराच्या बदल्यात हस्तांतरित करण्यात आल्या, याचा आर्थिक मागोवा घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

या मालमत्तांचा कथित आर्थिक व्यवहाराशी किंवा ठेवीदारांच्या हिताशी संबंध आढळल्यास कायद्यानुसार त्या जप्त करून विशेष न्यायालयामार्फत ठेवीदारांच्या वसुलीसाठी उपलब्ध करून द्याव्यात, अशी प्रमुख मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.



याशिवाय, उपलब्ध व्हिडिओंमध्ये फरार संचालक मयूर वैद्य आणि नितीन तुपे यांच्याशी संपर्क व मदतीसंदर्भातील कथित वक्तव्यांचा उल्लेख करण्यात आला असून संबंधित संपर्क नोंदी व आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

शिवरंग ॲग्रो बेस प्रायव्हेट लिमिटेडच्या संभाव्य खरेदी व्यवहारासंदर्भातील कथित संभाषणांचीही चौकशी व्हावी, तसेच बँक आणि न्यायालयीन प्रकरणे मॅनेज करण्याबाबत झालेल्या कथित वक्तव्यांमागील वस्तुस्थिती तपासावी, अशी मागणी पोटे यांनी केली आहे.

त्याचबरोबर भाग्यलक्ष्मी मल्टिस्टेट, रावसाहेब पटवर्धन पतसंस्था आणि आदर्श पतसंस्था (संभाजीनगर) यांच्या आर्थिक व मालमत्ता व्यवहारांमध्ये श्री. संतोष लुनिया किंवा त्यांच्या निकटवर्तीयांचा संबंध होता का, याचीही एकत्रित चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात व्हिडिओ क्रमांक ०८ चा उल्लेख करत श्रीरामपूर येथील गुन्ह्यानंतर संबंधित संचालकांना पोलीस कारवाईपासून वाचविण्यासाठी ३ लाख तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या संदर्भात १५ लाख दिल्याच्या आशयाची कथित वक्तव्ये असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, कोणत्याही विशिष्ट पोलीस अधिकाऱ्याने रक्कम स्वीकारल्याचा थेट आरोप नसून, या वक्तव्यांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी भूमिका प्रकाश पोटे यांनी स्पष्ट केली आहे.

मूळ व्हिडिओंची शासकीय न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेमार्फत तपासणी, कथित ६ कोटींच्या आर्थिक व्यवहाराचा तपास, संबंधित

# आदिवासी पारधी समाजाच्या भोसले कुटुंबाला बेघर करण्याचा कट?

### एमआयडीसी अधिकारी, कंपनी मालक व पोलिसांवर गंभीर आरोप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मौजे वाघुंडे बुद्रुक (ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) येथील आदिवासी हिंदू फासेपारधी समाजातील कीर्ती बाळू भोसले यांनी त्यांच्या वडिलोपार्जित मालकीच्या जागेवर बेकायदेशीर ताबा घेण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. संबंधित प्रकरणात सुपा एमआयडीसीचे अधिकारी, एका कंपनीचे मालक आणि काही पोलीस अधिकाऱ्यांनी संगनमत करून कुटुंबाला बेघर करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत दोषींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

भोसले यांनी दिलेल्या निवेदनानुसार, मौजे वाघुंडे बुद्रुक येथील गट क्रमांक १८८ मधील जमीन ही त्यांच्या वडिलोपार्जित मालकीची असून त्या मिळकतीवर आदिवासी जमीनधारकांशी संबंधित महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यातील हस्तांतरण निर्बंध (कलम ३६ व ३६-अ)



लागू असल्याचा दावा करण्यात आला आहे. अशा परिस्थितीतही संबंधित अधिकाऱ्यांकडून बेकायदेशीररीत्या जागेचा ताबा घेण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

भोसले यांच्या म्हणण्यानुसार, ८ जुलै २०२६ रोजी काही अधिकारी व संबंधित कंपनीच्या प्रतिनिधींनी पोलीस बंदोबस्तासह जागेवर येऊन तार कंपाउंड तोडले. तसेच सहा दिवसांच्या आत राहते घर हटवावे, अन्यथा तेही पाडण्यात येईल, अशी धमकी दिल्याचा आरोप त्यांनी केला आहे. यामागे संपूर्ण कुटुंबाला बेघर करण्याचे षडयंत्र असल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

या प्रकरणात सुपा एमआयडीसीचे संबंधित अधिकारी, कंपनीचे मालक तसेच संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी कायद्याचे उल्लंघन केल्याचा आरोप करत त्यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देऊ नये, अशीही मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, न्याय न मिळाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर संपूर्ण कुटुंबासह आत्मदहन करण्याचा इशारा भोसले कुटुंबाने दिला आहे. कुटुंबामध्ये तीन मुली, मुलगा, आई-वडील व इतर नातेवाईकांचा समावेश असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सदर प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली असून प्रशासनाने या प्रकरणाची योग्य दखल घेऊन न्याय मिळवून देण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# ढगे केमिस्ट्री क्लासेसच्या विद्यार्थ्यांचे परीक्षेत उल्लेखनीय यश

### तब्बल ९० विद्यार्थ्यांनी मिळवले ९० पेक्षा अधिक पर्सेंटाइल



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी असलेल्या सुवर्णपदक विजेते प्रा. प्रमोद ढगे यांच्या ढगे केमिस्ट्री क्लासेसने यंदाही परीक्षेत उल्लेखनीय यशाची परंपरा कायम राखली आहे. ८ विद्यार्थ्यांना ९९ पेक्षा अधिक पर्सेंटाइल तर तब्बल ९० विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा अधिक पर्सेंटाइल मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे.

यामध्ये तन्मय रोकडे (९९.८८ पर्सेंटाइल), श्रद्धा काळे (९९.८१ पर्सेंटाइल), मयुरेश शिंदे (९९.७७ पर्सेंटाइल), ऋतुराज रोकडे (९९.५२ पर्सेंटाइल), ओंकार जवक (९९.५१ पर्सेंटाइल), खुशी गुगळे (९९.२५ पर्सेंटाइल), मयूर पानमंद (९९.०२ पर्सेंटाइल) आणि श्रेया घोलप (९९.०१ पर्सेंटाइल) यांनी विशेष उल्लेखनीय यश मिळवत ढगे केमिस्ट्री क्लासेसच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

सुवर्णपदक विजेते प्रा. प्रमोद ढगे यांच्या प्रभावी आणि विद्यार्थीकेंद्रित अध्यापन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी आज वैद्यकीय, अभियांत्रिकी, संशोधन तसेच विविध प्रतिष्ठित क्षेत्रांमध्ये यशस्वीपणे कार्यरत आहेत. सर्वसामान्य कुटुंबातील अनेक विद्यार्थी ढगे केमिस्ट्री क्लासेसमध्ये शिक्षण घेत असून, माफक शुल्कात गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जात आहे.

या यशाच्या निमित्ताने डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पिंपरी, पुणे आणि दयान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी यांच्या सहकार्याने अहिल्यानगर मध्ये गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व करिअर मार्गदर्शन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पिंपरी, पुणे चे प्राचार्य डॉ. नितीन पी. शेरजे , डॉ. डी. जी. भालके (उपप्राचार्य), डॉ. पुष्पराज वारके (अधिष्ठाता) आणि डॉ. सुशील एस. बेनके ( पी.एच.डी (केमिकल बायोलॉजी), आयसर, पुणे सदस्य, रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री, इंग्लंड व डॉ. डी. बी. करंजुळे यांनी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, करिअरच्या संधी आणि यशस्वी वाटचालीसंदर्भात मार्गदर्शन केले.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत मान्यवरांनी त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियांका पाटील शेळके यांनी केले. तसेच या कार्यक्रमाला प्रा. प्रभाकर गवांदे, प्रा. विवेक चौधरी, प्रा. सुरेश जावळे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजन करण्यासाठी व्यवस्थापक युवराज महांडुळे, सहव्यवस्थापीका मोनाली पवार, मेधा बासकर यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रा. प्रमोद ढगे यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर मिळवलेल्या यशाचे कौतुक करुन विद्यार्थ्यांचे तसेच त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले.

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पारनेर यांचे कार्यालय, तालुका- पारनेर, जि. अहिल्यानगर**

**फोन नं. (०२४८८) २२१५२८ ईमेल आयडी –** tahasildarparner@gmail.

**क्र. कावि/अभिलेख/२५७/२०२५ पारनेर दि. २९/०६/२०२६**

## जाहीर प्रगटन

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, पारनेर यांचे न्यायालय**
अर्जदार- श्री. श्रीकांत बाबुराव कोरडे, रा. हिवरे कोरडा, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर.
विरूध्द
नगरपंचायत कार्यालय पारनेर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर
विषय – जन्म-मृत्यू नोंदी सुधारणा अधिनियम, २०२३ च्या अनुषंगाने जाहीर प्रगटन प्रसिद्ध करणे बाबत.

ज्याअर्थी, अर्जदार श्री. श्रीकांत बाबुराव कोरडे, रा. हिवरे कोरडा, ता. पारनेर जि. अहिल्यानगर यांनी मुलाच्या जन्म नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबंधीत निबंधकाने त्यांच्या जन्म नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे. त्यांच्या मुलाच्या जन्माची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १) | शौर्य श्रीकांत कोरडे | मुलगा | ३१/१२/२०२१ |

निबंधकांनी दिलेल्या जन्म/मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायानुसार सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात यावे.
तसेच या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून द१५ दिवसांच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही तर संबंधित प्रकरणात उचित कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.
**आज दि. २९/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन दिले आहे.**

**शिक्का**

**सही/–**
**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी पारनेर**

# स्वयंरोजगारातून कुटुंब सक्षम होतील – विकास पालवे

**सामाजिक संस्थांच्या माध्यमातून महिलांना घरबसल्या शिवणकाम प्रकल्पाचे प्रारंभ | पहिल्याच टप्प्यात १३० महिलांना मिळाली रोजगाराची संधी | माविम, राही फाउंडेशन व जय युवा अकॅडमीचा पुढाकार**



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महिला स्वयंरोजगारातून कुटुंब सक्षम होतील. बेरोजगारीवर मात करून महिला सक्षमीकरणाचा राही फाउंडेशन, जय युवा अकॅडमी, महिला आर्थिक विकास महामंडळाचा (माविम) महिला स्वयंरोजगार प्रकल्प जिल्ह्यात आदर्श असल्याचे प्रतिपादन भारतीय डाक विभाग प्रमुखचे वरिष्ठ अधीक्षक विकास पालवे यांनी केले.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी घरबसल्या शिवणकाम प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी पालवे बोलत होते. या उद्घाटन सोहळ्यास मार्गदर्शक म्हणून स्वप्निल मेमोरियलचे संचालक इंजि. निलेश रासकर, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी उमेश कहाते, अर्थ आधार शक्ती बचत गटाचे प्रा. भगवान काटे, मेजर शिवाजी वेताळ, उद्योजक भाऊसाहेब सुंबे, राही फाउंडेशनच्या संचालिका रूपाली करांडे, निलेश गर्जे, ॲड. राजेंद्र करांडे, जय युवाचे अध्यक्ष ॲड. महेश शिंदे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते पर्यावरण रक्षणाचा संदेश देऊन तुलसीमातेला पाणी अर्पण करून उद्घाटन करण्यात आले. यावेळी माविमचे उमेश कहाते यांनी महिलांना फक्त प्रशिक्षण घेऊन उपयोग नाही, तर प्रत्यक्ष स्वयंरोजगार करण्याच्या दिशेने कार्य करणे गरजेचे आहे. घरबसल्या शिवणकामातून महिला आर्थिक सक्षम होतील. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या जिल्हाभरातील बचत गटातील महिला या प्रकल्पात निश्चितच सहभागी होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रा. भगवान काटे यांनी महिला सक्षमीकरण फक्त भाषणातून किंवा कागदावर न राहता प्रत्यक्ष कृतीशीलपणे प्रकल्पाच्या माध्यमातून साधला गेला पाहिजे. हा प्रकल्प राबवून राही फाऊंडेशन व जय युवा अकॅडमीने या चळवळीला चालना दिली असल्याचे ते म्हणाले.

प्रास्ताविकात संचालिका रूपाली करांडे म्हणाल्या की, या प्रकल्पाद्वारे १ हजार महिलांना स्वयंरोजगारातून दरमहा उत्पन्न मिळवण्याची संधी दिली जाणार असून, या प्रकल्पाद्वारे प्रत्येक सहभागी महिलांच्या कुटुंबांना सक्षम करण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. महेश शिंदे यांनी केले. आभार निलेश गर्जे यांनी मानले. प्रकल्प यशस्वीतेसाठी ॲड. मनीषा भिंगारदिवे, ॲड. विद्या शिंदे, ॲड. आरती शिंदे, भाऊसाहेब पादीर, राम अभंग, वनिता पाडळे, संगीता रणनवरे, फरजानाबाजी, कविता अभंग, सिंधू वाणी, तेजल येवले, सुवर्णा पारे, श्वेता वाघ, मिना औताडे, अनिता पाटोळे, हेमलता कांबळे, दिपाली उदमले, पल्लवी लांडगे, शबाना शेख, कुऱ्हे सर, राधेश्याम ब्राह्मणे, रजनीताई ताठे, सौ. वैरागर आदींनी परिश्रम घेतले.

प्रकल्पात जिल्ह्यातील माहेर फाउंडेशन, उडान फाउंडेशन, उमेद फाउंडेशन, समृद्धी महिला बहुद्देशीय संस्था, प्रगती फाउंडेशन, स्वप्निल मेमोरियल फाउंडेशन, शिवगामीनी फाउंडेशन, सप्तशृंगी आदिवासी महिला विकास प्रतिष्ठान, मानवसेवा प्रतिष्ठान, कर्तृत्ववान लोकसंचालित साधन केंद्र अहिल्यानगर, मुंबादेवी प्रतिष्ठान, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय संस्था, जागृती बहुउद्देशीय संस्था, अक्षय ग्रामीण युवा क्रीडा बहुउद्देशीय संस्था, साईकृपा बहुउद्देशीय संस्था, अजय फाउंडेशन, संघर्षनामा आदींचा सक्रिय सहभाग आहे.

**पहिल्याच टप्प्यात १३० महिलांना मिळाले घर बसल्या रोजगार**

बोल्हेगाव, डोंगरगण, भिंगार, कामरगाव, नेप्ती, अरणगाव, भूतकरवाडी, सावेडी, कोल्हेवाडी, मुकुंदनगर, बुरुडगाव, निंबळक, वडगाव गुप्ता आदी भागातील १३० महिलांनी घरबसल्या शिवणकामासाठी नियुक्त करण्यात आले आहे. यासाठी त्यांचे अर्ज भरून घेण्यात आले.

# भिंगारमध्ये संत जनार्दन स्वामी महाराज पालखी दिंडीचे भक्तीमय स्वागत

**जय हरी विठ्ठलच्या गजराने परिसर दुमदुमला | वारकऱ्यांना रोप भेट देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान केलेल्या श्री संत जनार्दन स्वामी महाराज (पालखी) पायी दिंडीचे भिंगारमध्ये आगमन होताच संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. 'जय हरी विठ्ठल... श्री हरी विठ्ठल', 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल' आणि 'श्री ज्ञानदेव तुकाराम' या नामघोषाने वातावरण दुमदुमून गेले. हरदिन मॉर्निंग ग्रुप आणि भिंगार राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने दिंडीचे अत्यंत उत्साहपूर्ण आणि पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले.



दिंडीच्या स्वागतासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या महापौर ज्योतीताई गाडे यांनी स्वतः डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन, हातात टाळ घेत वारकऱ्यांसमवेत हरिनामाचा गजर केला. त्यांनी दिंडीत सहभागी होत महिलांसमवेत फुगडी खेळत भक्तीचा आनंद लुटला. त्यांच्या सहभागामुळे उपस्थितांमध्ये उत्साह निर्माण झाला होता.

या स्वागत सोहळ्यासाठी श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते, भिंगार राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष व हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सर्वेश सपकाळ, प्रांजली सपकाळ, जहीर सय्यद, रमेश वराडे, दिलीप ठोकळ, अशोक पराते, ताराचंद ठोकळ, दीपक धाडगे, मच्छिंद्र बेरड, ह.भ.प. अनावडे महाराज, संपत बेरड, सुभाष पेंढुरकर, शिवाजी बेरड, रामनाथ गर्जे, शुभम भंडारी, दशरथ मुंडे, सखाराम अळकुटे, ओम माळगे, सिद्धूतात्या बेरड, ईवान सपकाळ, गोरक्षनाथ वामन, अमोल वागस्कर, संतोष बोबडे, नवनाथ मोरे यांच्यासह परिसरातील नागरिक, महिला व वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिंडीचे प्रमुख ह.भ.प. उद्धव महाराज आनंदे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. तसेच पाहुण्यांच्या हस्ते दिंडीतील वारकऱ्यांना रोपांची भेट देण्यात आली. दिंडी मार्गावर वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याचे आवाहन करण्यात आले. यानंतर पालखीतील पवित्र पादुकांचे पूजन महापौर ज्योतीताई गाडे, प्रा. माणिक विधाते तसेच सपकाळ परिवाराच्या वतीने करण्यात आले. वारकऱ्यांसह उपस्थित भाविकांनी रथातील पादुका डोक्यावर घेऊन हरिनामाच्या अखंड गजराने संपूर्ण भिंगार भक्तिमय झाले होते.

आनंदेवाडा, श्रीक्षेत्र देवगिरी–दौलताबाद (जि. छत्रपती संभाजीनगर) येथून निघालेली श्री संत जनार्दन स्वामी महाराज पालखी दिंडी आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे प्रस्थान करत असून नगर–करमाळा मार्गे तिचा प्रवास सुरू आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही भिंगारकरांनी मोठ्या श्रद्धा, भक्ती आणि सेवाभावाने दिंडीचे स्वागत करून वारकरी परंपरेचा सन्मान केला.

प्रास्ताविकात संजय सपकाळ यांनी या दिंडीला अनेक दशकांची परंपरा असल्याचे सांगितले. भिंगार शहरात दरवर्षी दिंडीचे उत्साहात स्वागत केले जाते आणि हा उपक्रम सामाजिक सलोखा, भक्ती आणि सेवाभाव वृद्धिंगत करणारा असल्याचे त्यांनी नमूद केले. ह.भ.प. उद्धव महाराज आनंदे म्हणाले, भिंगारचे वैशिष्ट्य म्हणजे येथील अबालवृद्ध दरवर्षी मोठ्या उत्साहाने दिंडीचे स्वागत करतात. वारकऱ्यांची सेवा ही थेट पांडुरंगापर्यंत पोहोचते, असा संत तुकाराम महाराजांचा संदेश आहे. त्याच भावनेतून भिंगारकर निस्वार्थ सेवा करीत असल्याचे ते म्हणाले.

प्रा. माणिक विधाते यांनी महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा गौरव करताना वारकरी संप्रदाय हा राज्याच्या सांस्कृतिक वैभवाचा अविभाज्य भाग असल्याचे सांगितले. पांडुरंगाच्या भेटीसाठी निघालेल्या वारकऱ्यांची सेवा म्हणजे प्रत्यक्ष विठ्ठलाची सेवा असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, ''आषाढी वारीमुळे शहरात भक्तीचे वातावरण निर्माण झाले आहे. वारकऱ्यांची सेवा करताना पांडुरंगाच्या भक्तीचा आनंद मिळतो. हरदिन मॉर्निंग ग्रुप पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने उत्कृष्ट कार्य करीत आहे. मला वारकरी परंपरेचा वारसा वडिलांकडून लाभला आहे.''

# अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा चालक–मालक संघटनेच्या नूतन पदाधिकाऱ्यांची कार्यकारणी जाहीर

**रिक्षाचालकांचे प्रश्न सोडविण्यासाठी संघटना अधिक सक्षमपणे लढणार – अध्यक्ष अविनाश घुले**



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा चालक–मालक संघटनेच्या नूतन पदाधिकारी व कार्यकारिणी जाहीर करण्यात आली यावेळी नूतन सदस्यांचा सत्कार खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला. संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले, कार्याध्यक्ष तथा राज्य कार्यकारणी सदस्य विलास कराळे पाटील तसेच महाराष्ट्र राज्य ऑटो रिक्षा चालक–मालक संघटना संयुक्त कृती समितीचे राज्य कार्यकारिणी सदस्य व उपाध्यक्ष दत्ता वामन यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला. संघटनेच्या कार्याला अधिक बळकटी देण्याचा निर्धार यावेळी सर्व पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. प्रारंभी ज्येष्ठ कामगार नेते डॉ. बाबा आढाव यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच संघटनेचे माजी अध्यक्ष कै. शंकरराव घुले (अण्णा) यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या संघर्षमय आणि संघटनात्मक कार्याचा आदर्श पुढील पिढीने घ्यावा, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. त्यानंतर सत्कार समारंभास प्रारंभ झाला.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले, कार्याध्यक्ष विलास कराळे पाटील, उपाध्यक्ष दत्ता वामन, नसीर खान, सुधाकर साळवे, सरचिटणीस अशोक औशीकर, सहसचिव जुनेद बागवान, खजिनदार गणेश आटोळे, प्रमुख सल्लागार कॉ. बाबा आरगडे, संघटक किशोर कुलट, सोपान दळवी, किशोर खुटे, सुनील ढोले, आशिष दांगडे, लक्ष्मण ढगे, शेख असलम, शिराज, संतोष भिंगारदिवे, सागर लांडे, निलेश कांबळे, बाळासाहेब साळवे, वसंत मोकाटे, दिलावर सय्यद, विकी भगत, शेख जमीर, सय्यद अमीन, अकबर, मिथुन चव्हाण, सुनील खरपे, कुदू शेख, , सुभाष शेळके, सतीश खेतमाळीस, विशाल शहापूरकर, प्रकाश तोरडमल, गोरख खांदवे, सतीश भोपाळ, जुबेर शेख, अक्षय गायकवाड, बाप्पू उमाप, अन्वर शेख, चेतन वैराळ, रामदास सुतार, अजय नाकोड, बाळासाहेब खुडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्ष अविनाश घुले आपल्या मनोगतात म्हणाले की, ''ऑटो रिक्षा चालक हा शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. मात्र, विविध प्रशासकीय अडचणी, वाढते इंधनदर, परवान्यांशी संबंधित प्रश्न, वाहतूक नियमांतील बदल आणि आर्थिक संकट अशा अनेक समस्यांना रिक्षाचालकांना दररोज सामोरे जावे लागत आहे. या प्रत्येक प्रश्नावर संघटना ठामपणे उभी राहील. कोणत्याही चालक–मालकावर अन्याय होऊ दिला जाणार नाही. सर्वांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटना सातत्याने लढा देत राहील.''

ते पुढे म्हणाले, ''संघटना ही केवळ पदांची नसून ती प्रत्येक रिक्षाचालकाची ताकद आहे. नवीन पदाधिकाऱ्यांनी जबाबदारीची जाणीव ठेवून संघटनात्मक काम अधिक प्रभावीपणे करावे. प्रत्येक सदस्यापर्यंत पोहोचून त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत. संघटनेत एकी, शिस्त आणि पारदर्शकता राखत सर्वांनी एकदिलाने काम केल्यास अहिल्यानगर जिल्ह्यातील रिक्षाचालकांचे प्रश्न सोडविण्यास निश्चितच यश मिळेल.''

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनीही नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून संघटनेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संघटनेने सामाजिक बांधिलकी जपत रिक्षाचालकांच्या हितासाठी विविध उपक्रम राबवावेत, असे मत अनेकांनी व्यक्त केले. संघटनेच्या माध्यमातून सर्वसामान्य रिक्षाचालकांना कायदेशीर मार्गदर्शन, शासकीय योजनांची माहिती आणि विविध कल्याणकारी उपक्रमांचा लाभ मिळावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

समारंभ संपूर्ण वेळ खेळीमेळीच्या आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. उपस्थित पदाधिकारी, सदस्य आणि रिक्षाचालकांनी एकमेकांचे अभिनंदन करून संघटना अधिक मजबूत करण्याचा संकल्प व्यक्त केला.

अखेरीस सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमामुळे संघटनेत नवचैतन्य निर्माण झाल्याची भावना उपस्थित सदस्यांनी व्यक्त केली.

## पैठणात मटका, जुगार आणि अवैध दारू विक्रेत्यांवर एलसीबीचा धडक छापा; १९ हजारांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पैठण–** जिल्हा पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील तसेच गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पैठण एमआयडीसी पोलीस ठाणे व पैठण पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटका, जुगार आणि अवैध दारू विक्री करणाऱ्यांविरुद्ध धडक कारवाई केली. या कारवाईत एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका ठिकाणी मटका–जुगार व अवैध दारू विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर छापा टाकण्यात आला. त्याचप्रमाणे पैठण पोलीस ठाण्याच्या हद्दीतही अशाच प्रकारची कारवाई करण्यात आली. दोन्ही कारवायांमध्ये एकूण १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. अवैध धंद्यांवर पोलीस प्रशासनाचा धाक कायम राहणार असून अशा कारवाया पुढेही सुरू राहतील, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## राहुलनगरात देशी दारूसह युवक जेरबंद; एमआयडीसी पोलिसांची कारवाई

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पैठण–** राहुलनगर (कातपूर) येथील बाजारतळ परिसरात बेकायदेशीररित्या देशी दारूची विक्री करण्याच्या उद्देशाने साठा करून ठेवणाऱ्या एका युवकाला एमआयडीसी पैठण पोलिसांनी अटक केली. या कारवाईत १,५०० रुपयांचा देशी दारूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १० जुलै रोजी सायंकाळी ७.४० वाजण्याच्या सुमारास राहुलनगर कातपूर येथील बाजारतळाजवळील मोकळ्या जागेत ही कारवाई करण्यात आली. आरोपी अमन प्रकाश गुंडेकर (वय ३०, रा. राहुलनगर, कातपूर, ता. पैठण) याच्याकडून भिंगरी संत्रा या लेबलच्या १८० मिलीच्या १५ सीलबंद देशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. या मुद्देमालाची अंदाजे किंमत १,५०० रुपये आहे.

याप्रकरणी पोलीस हवालदार कर्तारसिंग कमलसिंग सिंगल यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २२३/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार रहाटवाड करीत आहेत.

(पान १ वरून)

## मंत्री विखेंच्या पुढाकाराने जिल्ह्यात वारी नियोजनाचा पॅटर्न

फडणवीस यांनी पाठबळ दिले आहे.राज्य सरकारने यंदाच्या वर्षी तीन कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

वारकर्यांसाठी रुग्ण सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून महात्मा फुले जन आरोग्य योजना असलेल्या रूग्णालयांना मोफत सुविधा देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.यंदा प्रथम मुख्यमंत्री सहाय्यता कक्षानेही वारीच्या सेवेत योगदान देण्याचा निर्णय केला असून जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालयांच्या मदतीने वारकरी चरणसेवेचा उपक्रम नव्याने सुरू झाला आहे.पावसाळी अधिवेशन सुरू असतनाही मंत्री विखे पाटील यांनी वारीसाठी केलेल्या नियोजनाचा सातत्याने आढावा अधिकार्याकडून घेत होते.यंदाच्या वर्षी झालेल्या नियोजनाबद्दल वारकरी समाधान व्यक्त करीत आहेत.

## राज्यासह देशावर अल निनोच्या संकटाचे ढग

पावसाने दमदार हजेरी लावली आहे. जुलै महिन्याच्या ३१ दिवसांत मिळून पडणाऱ्या पावसाच्या सरासरीहून अधिक पाऊस अवघ्या पाच दिवसांत पडला आहे. अल निनोच्या प्रभावामुळे मान्सून एकाच दमात पडण्याऐवजी तुकड्या–तुकड्यांमध्ये पडतो. म्हणजे काही दिवस अतिवृष्टी होते आणि त्यानंतर सलग अनेक दिवस कडक ऊन किंवा कोरडा दुष्काळ पडतो. जुलैच्या उत्तरार्धात म्हणजेच शेवटच्या आठवड्यात मान्सूनचा दुसरा सक्रिय टप्पा येण्याची आशा असली, तरी तोपर्यंत शेतकऱ्यांना आभाळाकडे डोळे लावून बसावे लागणार आहे. तर १९ जुलैपर्यंतही हीच स्थिती कायम राहू शकते.

## भारतीय प्रवाशांची बोट उलटून व्हिएतनाममध्ये १५ पर्यटकांचा मृत्यू

बोट उलटल्याचे पाहताच आसपास असलेल्या इतर पर्यटकांच्या नावा मदतीसाठी तात्काळ धावून आल्या. अवघ्या ५ मिनिटांत इतर नावांमधील चालकांनी बचावकार्य सुरू केले. मात्र, अनेक पर्यटक बोटीच्या आत अडकल्याने सुरुवातीला अडचणी आल्या.

घटनेची माहिती मिळताच एन थोई बॉर्डर गार्ड्सनी दोन जहाजे, ३५ अधिकारी आणि सैनिकांना घटनास्थळी पाठवले. नौसेना, कोस्ट गार्ड आणि इतर स्थानिक यंत्रणांनी युद्धपातळीवर शोधमोहीम राबवून सर्व ३६ जणांना किनाऱ्यावर आणले. यापैकी २१ जणांचे प्राण वाचवण्यात यश आले असून, २ महिला आणि १३ पुरुषांसह एकूण १५ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली आहे.

## सकाळी मंगळसूत्र चोरी, दुपारी घरफोडी; नवीन पीआयना गुन्हेगारांची कडक सलामी!

दिवशी सकाळी आणि दुपारी घडलेल्या या गंभीर घटनांमुळे शहरात पोलिसांचा धाक उरला आहे की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. नवीन ठाणेदार साहेब आता तरी खुर्ची सोडणार का? आक्रमक पवित्रा घेणार का ? असा सवाल नागरिक विचारत आहे. आता नवीन पीआय चोरट्यांनी दिलेल्या या आव्हानाचा सामना कसा करतात आणि चोरट्यांच्या मुसक्या कधी आवळतात, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

## 'वारकरी माझ्या दारात येतात, मी नशीबवान' – करीमशेठ हुंडेकरी

राष्ट्रीय एकात्मतेचे हे जिवंत उदाहरण असून, त्यांच्या सेवेतून खरी माणुसकी अनुभवायला मिळते.''

हाजी करीमशेठ हुंडेकरी यांनीही अत्यंत भावनिक शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, ''वारकरी कोणाच्या दारात सहज जात नाहीत. ते माझ्या दारात येतात, हे माझे भाग्य आहे. परमेश्वराने दिलेल्या कृपेने ही सेवा करण्याची संधी मिळत आहे. मी नसतानाही माझी मुले ही परंपरा कायम ठेवतील. हुंडेकरी लॉनमध्ये कोणत्याही समाजाच्या धार्मिक कार्यक्रमासाठी आम्ही शुल्क घेत नाही. माणुसकी टिकली तरच समाज टिकेल.'' अशा भावनिक शब्दाने वारकऱ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

यंदाची सायकल वारी 'हरितवारी, पर्यावरणपूरक वारी' या संकल्पनेसह अवयवदान जनजागृतीचा संदेश घेऊन पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत आहे. पर्यावरण संवर्धन, आरोग्यदायी जीवनशैली आणि सामाजिक बांधिलकी यांचा संदेश देत ही वारी दरवर्षी हजारो नागरिकांचे लक्ष वेधून घेते. यावेळी अविरत १४ वर्षे सायकल वारकऱ्यांचे स्वागत करणाऱ्या हाजी करीमशेठ हुंडेकरी यांचा नाशिक सायकलिस्ट फाऊंडेशनच्या वतीने विशेष गौरव करण्यात आला. ''हुंडेकरी परिवाराच्या योगदानामुळे प्रत्येक सायकलपटूला नवचैतन्य मिळते,'' अशा भावना अनेक सायकलिस्टांनी व्यक्त केल्या.

स्वागत सोहळ्यावेळी युगंदर वाद्यपथकाच्या दणदणीत वादनाने परिसर भक्तिमय आणि उत्साहपूर्ण झाला. पहिल्यांदाच वारीत सहभागी झालेल्या युवक–युवतींनी आपले अनुभव कथन करत वारीमुळे मिळालेली ऊर्जा, शिस्त, भक्ती आणि सामाजिक जाणीव यांचा उल्लेख केला.

विशेष म्हणजे, या सायकल वारीचा पहिला मुक्काम दरवर्षी हुंडेकरी लॉनमध्येच असतो. या दिवसासाठी लॉन पूर्णपणे वारकऱ्यांसाठी राखीव ठेवले जाते. अगदी लग्नाचे बुकिंगही या दिवशी स्वीकारले जात नाही. वारकऱ्यांच्या निवासापासून नाश्ता, भोजन आणि आवश्यक सर्व सुविधांची मनापासून व्यवस्था केली जाते. गेली १४ वर्षे अखंड सुरू असलेली ही सेवा केवळ आदरातिथ्य नसून, समाजात राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि माणुसकीचा दीप तेवत ठेवणारा प्रेरणादायी उपक्रम ठरत आहे. या उपक्रमातून 'धर्मापेक्षा माणुसकी श्रेष्ठ' हा संदेश दिला जात आहे.